# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 January 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १६ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- इस्रोचा स्पेस डॉकिंग प्रयोग यशस्वी–अशी कामगिरी करणारा भारत हा जगातला चौथा देश
- केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
- राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार–राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांची घोषणा

आणि

- हिंगोली जिल्ह्यात सारंगवाडी इथं भाजीचा महाप्रसाद घेण्यासाठी भाविकांची गर्दी

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था - इस्रोनं स्पेस डॉकिंग प्रयोगाअंतर्गत अवकाशात उपग्रहांची जोडणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. इस्रोनं सामाजिक माध्यमावर ही घोषणा केली. या तंत्रज्ञानात यश मिळवणारा भारत हा जगातला चौथा देश बनला आहे. या यशस्वी प्रयोगाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रोच्या शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं आहे. येत्या काही वर्षांत भारताच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमांसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

****

प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात भारतीय वायू दल एक शानदार हवाई प्रदर्शन सादर करणार आहे. कर्तव्य मार्गावर एकूण ४० विमाने फ्लायपास्ट करतील, ज्यामध्ये वैविध्य, अचूकता आणि कौशल्याचं सादरीकरण केलं जाईल, अशी माहिती विंग

कमांडर मनीष शर्मा यांनी दिली आहे. भारताची सर्वोत्तम लढाऊ विमाने आणि शस्त्रागारातील बहुमुखी यंत्रे, या फ्लायपास्टमध्ये सहभागी होणार आहेत.

****

केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी आठव्या वेतन आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलतांना ही माहिती दिली. सातव्या वेतन आयोगाचा कालावधी २०२६ मध्ये संपणार आहे, आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेमुळे आयोगाच्या शिफारशी मिळविण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल, असं वैष्णव यांनी सांगितलं. ते म्हणाले –

> ***केंद्र सरकार के सभी कर्मचारियों के लिये 8th Pay Commission के मंजुरी दे दी है। प्रधानमंत्रीजी ने एक रेग्युलर रिदम के साथ पे कमिशन बनाने का जो एक संकल्प लिया है, उसके हिसाब 2016 मे सेवंथ पे कमिशन स्टार्ट हुआ था, तो 2026 मे इसका टर्म कंप्लिट होता है।***

२०४० पर्यंत चांद्रमोहिमेसाठी ३ हजार ९८५ कोटी रुपये खर्चाच्या तिसऱ्या लाँच पॅडला मंजुरी देण्यात आल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

****

न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांनी आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी न्यायमूर्ती चंद्रन यांना पदाची शपथ दिली. न्यायमूर्ती चंद्रन हे केरळ उच्च न्यायालयातही न्यायाधीश राहिले आहेत.

****

सरकार नागरिकांसाठी रस्ते सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी वचनबद्ध असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं 'रस्ते सुरक्षा–भारतीय रस्ते ॲट २०३०: सुरक्षित जागा' या विषयावरील दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेला ते संबोधित करत होते. रस्त्यावर संपूर्ण सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी लोकांना खबरदारी घेण्याबाबत शिक्षित करण्याचे आवाहन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना केलं.

****

राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार असल्याची घोषणा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. आज मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलात जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये 'राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमाचं, मुख्यमंत्र्यांनी ए आय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन करून उद्घाटन केलं, त्यावेळी ते बोलत होते.

***महाराष्ट्रामध्ये आम्ही इनोव्हेशन सिटी ही तयार करू. ज्या प्रकारे गिफ्ट सिटी तयार झाली आहे, तशा प्रकारे इनोव्हेशनचा फोकस असलेली सर्व प्रकाराने उपयुक्त अशा प्रकारची एक इनोव्हेशन सिटी आम्ही तयार करणार आहोत. आणि अतिशय वेगाने. With the speed, we want to create this city.***

महाराष्ट्र ही भारताची स्टार्टअप राजधानी असून, यात छत्रपती संभाजीनगर सह सर्वच शहरांचा मोलाचा वाटा असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. काळाची गरज ओळखून स्टार्ट अप धोरणाचा नवीन मसुदा उद्योजकांना सूचनांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक महिला संचालक राज्य असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली, ते म्हणाले –

***मला सांगताना आनंद वाटतो की महाराष्ट्र हे आता स्टार्टअप्स मध्ये सर्वाधिक महिला डिरेक्टर असलेलं राज्य देशामध्ये झालेलं आहे, ही देखील अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. आणि देशातल्या स्टार्टअप ईकोसिस्टीमच्या पहिल्या सात राज्यामध्ये सगळ्यात पहिल्या क्रमांकाचं राज्य हे महाराष्ट्र आहे ही देखील आपल्या सगळ्यांकरता अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.***

****

अभिनेता सैफ अली खान यांच्यावर मुंबईतल्या राहत्या घरी हल्ला असून, सैफ यांना लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. आज पहाटे सैफ अली खान यांच्या घरी दरोड्याचा प्रयत्न झाला, हा दरोडा रोखण्याच्या प्रयत्न करणाऱ्या सैफ यांच्यावर दरोडेखोराने चाकूने सहा वार केले, त्यातल्या दोन जखमा खोल आहेत. त्यामुळे सैफ अली खानवर शस्त्रक्रिया करण्यात असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, या हल्ल्याचा तपास करण्यासाठी पोलिसांच्या एकूण १५ पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यात

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या ८ आणि मुंबई पोलिसांच्या ७ पथकांचा समावेश आहे.

****

मुंबई – अमरावती, पुणे – अमरावती वंदे भारत एक्स्प्रेस सुरु करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनानं घेतला आहे. आतापर्यंत राज्यात पुणे आणि मुंबई इथून वंदे भारत रेल्वे गाड्या धावतात, या गाड्या सोलापूर, शिर्डी, गोवा, कोल्हापूर आणि जालना शहरांमध्ये जातात.

****

प्रयागराज इथं कुंभमेळ्यात आज भव्य सांस्कृतिक महाकुंभ होत आहे. यामध्ये विख्यात कलाकार भारतीय संस्कृतीची समृद्धी दर्शवणारे कला प्रकार सादर करत आहेत. गंगा पंडालमध्ये होत असलेल्या मुख्य व्यासपीठावर प्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांचं विशेष सादरीकरण होत आहे. आज यमुना आणि सरस्वती मंडळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत. २१ जानेवारीपासून त्रिवेणी पंडालमध्ये कार्यक्रम सुरू होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन आज सर्वत्र साजरा केला जात आहे. यंदाचं राज्याभिषेकाचं तीनशे पंचेचाळीसावं वर्ष आहे. यानिमित्तानं सर्वत्र संभाजी महाराजांना अभिवादन करण्यात येत आहे. धुळ्यातही अभिवादन कार्यक्रम पार पडला

****

चित्रपट क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण करता आलं पाहिजे असं मत प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, पटकथाकार तिग्मांशू धुलिया यांनी व्यक्त केलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज दुसऱ्या दिवसी मास्टर क्लास या सदरात धुलिया यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली, कलाकाराला विद्रोही होता आलं पाहिजे असं मतही धुलिया यांनी यावेळी व्यक्त केलं. हिंदीतले प्रसिद्ध लेखक उदय प्रकाश यांच्या 'दिल्ली की दिवार' या कथेवर चित्रपट बनवणार असल्याची माहिती धुलिया यांनी दिली.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या औंढा नागनाथ तालुक्यातील सारंगवाडी इथल्या डोंगरावर संक्रांतीच्या तिसऱ्या दिवशी भाजीचा महाप्रसाद आयोजित केला जातो. आज या ऐतिहासिक यात्रेला भाविकांनी मोठी गर्दी केली. सुमारे दीड लाख भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे –

***परिसरातील शेतांमध्ये पिकलेल्या ४० प्रकारच्या पालेभाज्या, फळभाज्या व कंदमुळे यांचा समावेश असलेल्या १४० क्विंटल भाजीच्या महाप्रसादाचा लाभ उपस्थित भाविकांनी घेतला. भाजीच्या महाप्रसादाचे सेवनाने वर्षभर रोगराई होत नाही अशी गाढ श्रद्धा असलेल्या भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.***

***आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.***

****

बीड इथं महारेशीम अभियानाअंतर्गत चित्ररथाला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी हिरवा झेंडा दाखवून अभियानास सुरुवात केली. हे अभियान ९ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. राज्यात बीड जिल्हा रेशीम उत्पादनात प्रथम क्रमांकावर असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे –

***सध्या बीड जिल्ह्यात सुमारे साडे पाच हजार शेतकरी रेशीम उद्योगात कार्यरत आहेत, कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत विभागाकडून शासनमान्य कोष खुली बाजारपेठ उभारण्यात आली असून यामध्ये होणाऱ्या कोष खरेदीत बीड जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. उसतोड कामगारांचा जिल्हा ही ओळख मागे पडून आता बीडची रेशीम उत्पादक जिल्हा म्हणून ओळख निर्माण होत आहे.***

***रवी उबाळे आकाशवाणी बातम्यांसाठी बीड.***

****

अहिल्यानगर इथं रेशीम शेती जनजागृती अभियानाचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात माहिती रथाला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. जिल्ह्यात साडे नऊशे एकर क्षेत्र नोंदणीचा लक्षांक देण्यात आला असून, शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन नोंदणीची सुविधाही उपलब्ध असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

****

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त परभणी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन कथाकार राजेंद्र गहाळ यांच्या हस्ते झालं. ग्रंथ प्रदर्शन येत्या २८ जानेवारीपर्यंत चालणार आहे.

****